# औषध निरीक्षक भरती परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणी संसदेत महाविकास आघाडीचे जोरदार निदर्शने



**नवी दिल्ली, (वृत्त सेवा):-** महाराष्ट्रातील औषध निरीक्षक (ड्रग इन्स्पेक्टर) भरती परीक्षेतील कथित पेपरफुटीप्रकरणी सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह महाविकास आघाडीच्या खासदारांनी आज संसदेच्या मकरद्वारासमोर जोरदार निदर्शने केली. राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांबाबत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी होणारा खेळ कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. स्पर्धा परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आशा-आकांक्षांवर पाणी फेरणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे परीक्षेच्या संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. औषध निरीक्षक भरती परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी, तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी प्रभावी आणि पारदर्शक यंत्रणा उभारण्यात यावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या खासदारांनी केली.

तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेल्या सर्व शंका तातडीने दूर करून भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणावी आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करावा, ही सरकारची जबाबदारी आहे, असेही यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी ठामपणे सांगितले. विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आणि पारदर्शक भरती प्रक्रियेसाठी संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार यावेळी महाविकास आघाडीच्या खासदारांनी व्यक्त केला.

# श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमीचे आज उद्घाटन



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून ३९ वर्षामध्ये अनेक उल्लेखनीय उपक्रम राबविले जात आहेत. यामध्ये क्रिडा क्षेत्राची भर पडली आहे. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून मंडळा लगत असलेल्या एस.टी. बस वाहनतळ जागेत अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमीचे उद्घाटन सोहळा मोठ्या थाटामाटात भारतीय, रणजी, महाराष्ट्र क्रिकेट संघाचे खेळाडू, प्रशिक्षक, निवडकर्ता या मान्यवरांचे उपस्थितीत बुधवारी संपन्न होणार आहे. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट, अक्कलकोट संचलित अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमी उदघाटन मा.ना. मुरलीधर मोहोळ, केंद्रीय हवाई राज्यमंत्री, ना. जयकुमार गोरे, पालकमंत्री, सोलापूर, .भरतशेठ गोगावले, रोजगार हमी योजना मंत्री, शेखर निकम, आमदार, चिपळूण, .सचिन कल्याणशेट्टी, आमदार, अक्कलकोट, सिद्धाराम म्हेत्रे, माजी गृहराज्य मंत्री, .मिलन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष, महेश गावस्कर, सी.ए. पुणे, जनार्दन उर्फ अण्णा गणपत थोरात, अध्यक्ष, अखिल भारतीय मंडई मंडळ पुणे, विश्वस्त- स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांच्या हस्ते व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष- जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आणि चंद्रकांत पंडित, माजी भारतीय क्रिकेटपटू व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक, समीर दिघे, माजी भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक, .संजय पाटील, सिलेक्टर, रणजी ट्रॉफी, मुंबई व मुंबई क्रिकेट असोसिएशन, TRDO चे चेअरमन, .धर्मराज गोपाल सिंग, सिंगस स्पोर्ट्स, मुंबई,.ॲड. नितीन हबीब, जेष्ठ विधिज्ञ व कायदे विषयक सल्लागार, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट, ॲड. संतोष खोबरे, ओंकारेश्वर उटगे, चार्टर्ड अकाऊंटंट, अरविंद शिंदे, योगेश अहंकारी, आर्कीटेक्ट, बालाजी सलगर, यश इंजिनियरिंग,पुणे, .किरण पाटील, इंजिनिअर्स व कॉन्ट्रॅक्टर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुपौर्णिमा, शके-१९४८ दि. २९ जुलै २०२६ बुधवार रोजी दु. १२.३० वा. संपन्न होणार आहे.

अक्कलकोट शहरासह ग्रामीण भागातील खेळाडूना प्रोत्साहनपर श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अकॅडमीची संकल्पना न्यासाकडून हाती घेण्यात आलेली आहे. या अकॅडमीच्या माध्यमातून क्रिकेट महिला व पुरुष खेळाडूंना सराव करिता चेंजिग रूम, कॅफे, ओपन जीम इ. सर्व अत्याधुनिक सोयी-सुविधांसह उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचे टर्फ हे दर तासी माफक दर आकारले जाणार आहे. अकॅडमी उभारणी कामी सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे सुनिल मालप, चंद्रकांत रेम्बोर्सो, किशोर बोरामणी, उदय डोके, राजेंद्र गोटे, संतोष बडवे, अभिजित गुंड यांचे सहकार्य लाभले असून, या अकॅडमीच्या टर्फ ची उभारणी धर्मराज सिंग, सिंगर्स स्मार्टस, मुंबई यांनी केली आहे.

# 29 जुलै ते 2 ऑगस्ट 2026 रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री महोदय यांचा वाढदिवस तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त महसूल विभागाच्या निर्देशानुसार दि. 29 जुलै ते 2 ऑगस्ट 2026 या कालावधीत विधानसभा मतदारसंघनिहाय 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियानाचे आयोजन करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत 249 -सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघातील समाधान शिबिराचे आयोजन बुधवार, दि. 29 जुलै 2026 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत श्री शिवछत्रपती रंगभवन सभागृह, सोलापूर येथे करण्यात आले आहे.

या शिबिरास मा. जिल्हाधिकारी, मा. अपर जिल्हाधिकारी, मा. निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर तसेच मा. आमदार महोदय उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसिलदार उत्तर सोलापूर निलेश पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# राजेंद्र गुंड यांना आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन योग्य सन्मान केला- व्हा.चेअरमन अशोक लुणावत



**मानेगाव (कटूसत्य वृत्त):-** आज प्रत्येक क्षेत्रात भयंकर स्पर्धा व चढाओढ आहे.विशेषतः लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेच्या क्षेत्रात वस्तुनिष्ठ व निर्भिडपणे लेखणीच्या माध्यमातून सामाजिक,राजकीय, शैक्षणिक,कृषी व प्रशासकीय क्षेत्रातील समस्या व प्रश्न प्रभावीपणे मांडणे ही मोठी तारेवरची कसरत आहे.या सर्व बाबींवर खरे उतरल्यानेच राज्यातील नामांकित, वाचनीय व लिडींग दैनिक असलेल्या पुण्यनगरी समूहाच्या वतीने माढा तालुक्यातील मानेगावचे प्रतिनिधी राजेंद्र गुंड सर यांना जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन योग्य सन्मान केल्याचे प्रतिपादन माढेश्वरी अर्बन बँकेचे व्हा.चेअरमन अशोकशेठ लुणावत यांनी केले.

ते माढा येथे विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक तथा दैनिक पुण्यनगरीचे आदर्श पत्रकार राजेंद्र गुंड सर यांचा साई सेल्स कार्पोरेशन व अंजनगाव उमाटे येथील काशीद उद्योग समूहाच्या वतीने रविवारी 26 जुलै रोजी सत्कार करताना बोलत होते.

यावेळी आदर्श शिक्षक तथा आदर्श पत्रकार राजेंद्र गुंड सर यांचा सत्कार करुन व्हा. चेअरमन अशोक लुणावत व माजी सरपंच गणेश काशीद सर यांनी पेढे भरवून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माढेश्वरी बँकेचे माजी संचालक तथा अंजनगाव उमाटेचे माजी सरपंच गणेश काशीद सर यांनी सांगितले की, मानेगाव जिल्हा परिषद गटाच्या विविध गावांतील सर्व प्रकारच्या व स्तरातील बातम्यांना लेखणीतून न्याय देण्याची भूमिका पत्रकार राजेंद्र गुंड सर यांनी मागील 10 वर्षापासून जपली आहे. सर्वसामान्य जनता, कष्टकरी शेतकरी,गुणवंत विद्यार्थी,शासकीय अधिकारी व नोकरदारांसह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील घडामोडी वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे विधायक कार्य त्यांनी केले आहे.या बाबींची दखल घेऊन त्यांना दैनिक पुण्यनगरी समूहाने ग्रामीण भागातील जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित केले आहे.ही बाब मानेगाव गटासह माढा तालुक्यासाठी अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अंजनगाव उमाटेचे हभप हिरालाल पोतदार, दारफळ सीनाचे इंजिनिअर अभिजित लुणावत,सौदागर काशीद,पांडुरंग कन्हेरे, यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.


## जाहीर प्रसिध्दीकरण
जन्म-मृत्यु नोंद अर्ज ४८१/२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

नलोफर खलील रहिमान सुर्खी (लग्नापुर्वीचे नाव)
निलोफर रियाज पाटील, (लग्नानंतरचे नाव) } अर्जदार

**विरूद्ध**

ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक)
ग्रामपंचायत, सय्यद वरवडे,
ता. मोहोळ, जि. सोलापूर } सामनेवाला

ज्या अर्थी वर नमुद अर्जदार यांचा जन्म ता.०१/०६/१९६२ रोजी मौजे सय्यद वरवडे,ता.मोहोळ,जि.सोलापूर येथे झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद सामानेवालानी जन्म-मृत्यु रजिष्टरला जन्म तारखेपासुन एक महिन्याचे आत करणे आवश्यक होते. परंतु अर्जदार हे कामानिमित्त बाहेर गावी गेल्यामुळे अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद करु शकले नाहीत. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश सामानेवाला यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने कोर्टात सदरचा अर्ज दाखल करुन केलेली आहे. त्याअर्थी तमाम लोकांस सदर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांचा जन्म ता.०१/०६/१९६२ रोजी झाल्यामुळे त्यांच्या जन्माची नोंद सामानेवाला चे जन्म-मृत्यु रजिष्टरला रेकॉर्डवर घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांचे आत अगर सदर अर्जाचे कामी नेमलेली तारीख १२/०८/२०२६ रोजी आपली तक्रार/ हरकत स्वतः अगर वकिलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करुन सामानेवाला यांना अर्जदार यांचा जन्म दि.०१/०६/१९६२ रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता.२८/०७/२०२६.

क.लिपिक (शिक्का) मा. तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण
जन्म-मृत्यु नोंद अर्ज ४८२/२०२६

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे कोर्टात**

लखन किसन कुचेकर, } अर्जदार

**विरूद्ध**

ग्रामविकास अधिकारी (ग्रामसेवक) ग्रामपंचायत,
सय्यद वरवडे,ता.मोहोळ,जि.सोलापूर } सामनेवाला

ज्या अर्थी वर नमुद अर्जदार यांचा जन्म ता. १०/११/१९९८ रोजी मौजे सय्यद वरवडे, ता. मोहोळ,जि.सोलापूर येथे झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद सामानेवालानी जन्म-मृत्यु रजिष्टरला जन्म तारखेपासुन एक महिन्याचे आत करणे आवश्यक होते. परंतु अर्जदार हे कामानिमित्त बाहेर गावी गेल्यामुळे अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद करु शकले नाहीत. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश सामानेवाला यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल करुन केलेली आहे. त्याअर्थी तमाम लोकांस सदर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांचा जन्म ता.१०/११/१९९८ रोजी झाल्यामुळे त्यांच्या जन्माची नोंद सामानेवाला चे जन्म-मृत्यु रजिष्टरला रेकॉर्डवर घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांचे आ अगर सदर अर्जाचे कामी नेमलेली तारीख १२/०८/ २०२६ रोजी आपली तक्रार/ हरकत स्वतः अगर वकिलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी.मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करुन सामानेवाला यांना अर्जदार यांचा जन्म दि.१०/११/१९९८ रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता.२८/०७/२०२६.

क.लिपिक (शिक्का) मा. तहसिलदार सो, मोहोळ

## जाहीर प्रसिध्दीकरण
दि.कि. अर्ज क्रं. ४१/२०२६
निशाण क्र.

**मोहोळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

श्रीमती मीना विलास सोवनी, } अर्जदार

**विरूद्ध**

कोणीही नाही } सामनेवाला

ज्याअर्थी मकरंद विलास सोवनी याचे दि.१०/०४/२००० रोजी निधन झाले असून अर्जदार ही त्याची कायदेशीर वारस आहेत. मकरंद विलास सोवनी याचे मृत्यूपश्चात त्याचे वारस म्हणून त्याचे मालकीच्या मिळकतीस वारस नोंद करण्यासाठी आपले नावे वारसप्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्जदार हिने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदार हिचे हक्कात सदरचे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/ हरकत स्वत: अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून अर्जदार हीस रीतसर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दि. २८/७/२६

लिपिक (शिक्का) सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर मोहोळ


# स्पर्धा परीक्षेचा तडवळा पॅटर्न चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत कायम

**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाने घोषित केल्याप्रमाणे 2026 यावर्षीपासून चौथी व सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा 10 वर्षानंतर पुन्हा एकदा सुरू झाली. 26 एप्रिल 2026 रोजी ती संपन्न झाली.त्याचा निकाल 25 जुलै 2026 रोजी घोषित झाला.यामध्ये जिल्हा परिषद आदर्श केंद्रिय प्राथमिक शाळा कसबे तडवळे शाळेचे चौथीचे 26 विद्यार्थी व सातवीचे 8 विद्यार्थी पात्र झाले तर जिल्ह्यात सर्वोत्तम निकाल देताना कन्या शाळा चौथीच्या 41 विद्यार्थिनी व सातवीच्या 28 विद्यार्थिनी पात्र झाल्या आहेत. दोन्ही शाळांचे मिळून 103 विद्यार्थी पुन्हा एकदा पात्र झाले आहे.यामध्ये दोन्ही शाळेतील 200 गुणांपेक्षा जास्त गुण घेणारे 35 विद्यार्थी आहेत.यामध्ये जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथी वर्गातील विद्यार्थीनीं सूर्यवंशी वेदिका ,धोंगडे अंकिता,सूर्यवंशी शरयू,शिंदे मृण्मयी,जावळे श्रुती,होगले आरुषी,बामणे अवनी,पुजारी आरोही,लोंढे भक्ती,पैकेकर स्वरा,ठोंबरे श्रीशा,शिंदे श्रेया, सोनारी ईश्वरी,थोडसरे समृद्धी, सोकांडे श्रावणी,भक्ते स्वरा,सुरवसे सिद्धी,पवार अनुष्का,कावळे वेदिका ,गावकरे आराध्या,समुद्रे स्वराली,करंजकर आराध्या,जमाले वैष्णवी,होगले समीक्षा,मुजावर आयेशा,बारकुल गायत्री,गुरव श्रेया,शिंदे मृणाल,देशमुख शाश्वती,विभुते स्वरा,सुरवसे ज्ञानेश्वरी,चव्हाण वैष्णवी,देशपांडे शुभ्र,वाकडे सृष्टी,सोनार प्राची,बारबोले ज्योती ,शिंदे मानसी,गुळवे सिद्धी,धाबेकर यशश्री,फकीर सना,सोकांडे आरोही यांनी गुण घेतले आहेत.तसेच इयत्ता सातवी मध्ये पात्र विद्यार्थिनी मध्ये मते नंदिनी,कोरडे स्नेहा,शेंडगे संस्कृती,जमाले धनश्री,शेख जेबामहेक,जमाले वैष्णवी बाळाजी 238,ढमे अस्मिता,वाघ भक्ती, सपाटे अर्पूवा,लंगडे मोनाली,घुटे सानिका,जावळे श्रुती,धायगुडे आर्या,चव्हाण श्रावणी,कोरे शिवानी,राहिंज कार्तिकी,जाधव राधिका,जगदाळे स्वामिनी,चव्हाण वेदिका,होगले संस्कृती,गजाकोश स्वरांजली,होगले आर्या,कोतवाल आलिया,काटवटे अमृता,जमाले गोजिरी,तांबोळी फातिमा,कोतवाल जोया,शेंडगे ऐश्वर्या गुण घेऊन पात्र झाल्या आहेत.

तर जिल्हा परिषद आदर्श केंद्रिय प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथी वर्गातील कैवल्य माळी,फैजल शेख,फैजान पिंजारी,स्वरूप हिंगमिरे ,आर्यन लोमटे,शिवांश करंजकर, ओंकार घोरपडे ,किरण भांड,मल्हार मुळक,पृथ्वीराज सावंत,रुद्र पाटील,आर्यन रोहिदास,सागर इंगळे,इमाम मुजावर,तन्मय पांचाळ,विराज खारगे ,उदयराज आवटे,अनुज क्षिरसागर, सार्थक ढमे, ईश्वर घुटे,अनुज शिंदे,समर्थ करंजकर, अहमदरजा तांबोळी ,शुभम वाकडे,किरण शिंदे पात्र झाले आहेत तर सातवी वर्गातील समर्थ जमाले,भैरवनाथ सपाटे,योगेश लांडगे,अथर्व थोरवे,श्रेयश करंजकर,गणेश कसबे,शिवराज करंजकर,अनिकेत कदम पात्र झाले आहेत. शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना हरिश्चंद्र होगले यांनी रजिस्टर,पेन व गुलाबपुष्प देऊन सन्मानित केले.

जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक केशव पवार,चौथीच्या वर्गशिक्षिका मनीषा गावखरे, मिनाक्षी जमाले,अंजना नाईकवाडी तर सातवीच्या वर्गाला नीता कुंभार,अंजली डुमणे,हेमलता चांडगे यांचे मार्गदर्शन लाभले. तर कन्या शाळेतील विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक रहिमान सय्यद, चौथीच्या वर्गशिक्षिका रजनी ढोणे, संगीता दांगट व सातवीच्या वर्गाला स्पर्धा परीक्षेचे प्रमुख जगन्नाथ धायगुडे, पांडुरंग तनमोर, संजय देशटवाड,ऋषीकेश पवार,रामकृष्ण ढवळे, भिमाशंकर फुलारी,उषा वरूडकर, अंबिका कोळी,क्रांती मते यांचे मार्गदर्शन लाभले. दोन्ही शाळांच्या या यशाबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक रविंद्र खंदारे, विस्ताराधिकारी किशोरी जोशी,केंद्रप्रमुख सचिन मस्के,शाळेचे शा.व्य.स.अ. विजय पवार, कन्या शा.व्य. स.अ.प्रमोद जमाले यांनी यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या संचालकपदी पाचजण बिनविरोध

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** येथील श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या व्दैवार्षिक निवडणुकीत पाचजणांची संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

वाचनालयाच्या या निवडणुकीत पाच जागांसाठी एकूण आठजणांनी आपले उमेदवारी अर्ज भरले होते. परंतु, वाचनालयाचे ज्येष्ठ संचालक ॲड. धनंजय माने यांच्या मध्यस्थीने त्यातील दत्ता भोसले, रजनीश जोशी आणि प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख या तिघांनीही माघार घेतली. त्यामुळे 19 जुलै रोजी झालेल्या वाचनालयाच्या वार्षिक सभेत पाचजणांची संचालक म्हणून निवड जाहीर करण्यात आली. निवड झालेल्यांमध्ये प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर, मोहन सोहनी,प्रा. सुलभा पिशवीकर, प्रा. डॉ. नभा काकडे आणि प्रा .नागनाथ नवगिरे यांची पुढील सहा वर्षासाठी संचालक म्हणून निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून माजी प्राचार्य के. एम. जमादार यांनी काम पाहिले. या सर्व नूतन संचालकांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक 03 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 10.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी दिली.

या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची

माहिती उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.


## CHANGE IN NAME

I am changing my name from **SANJAYKUMAR VASANT METKARI** To **SANJAY VASANT METAKARI** for passport issuance as per document.

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) महाराष्ट्राचे राष्ट्रवादीतून पुढे आलेले एक नेते
२) एक हिंदी सिनेनिर्माते-** चोप्रा ३) डाळ अथवा भात शिजवण्यासाठी याचा वापर करतात ४) आडातून पाणी खेचण्याचे चक्राकार साधन
५) सलमान खानचा थोरला भाऊ
६) भारतीय क्रिकेट टीममधील ऐंशीच्या दशकातील अष्टपैलू खेळाडू ११) दात
१३) मोठी पेटी
१६) पाठवणे, **** करणे
२०) सूट, मोकळीक
२२) महादेवाचे एक नाव २४) महाराष्ट्रातील एक जिल्हा
२७) शरीर, काया
२८) कार उलट लिहा
२९) चांगला रूचकर स्वयंपाक बनविणारी स्त्री
३०) कपडे धुण्याचा एक साबण
३२) समुद्र ३३) बंदूक (इंग्रजीत)
३४) चरण ३६) हळू, मंद गतीने
३७) शुभकार्यासाठी उभारलेला छत
३९) सातत्याने, नेहमी
४१) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत)
४२) ईश्वर (हिंदीत),४६) श्रीविष्णू पत्नी
४७) गंध, परिमळ

**आडवे शब्द :** १) हेराफेरी चित्रपटातील एक प्रमुख अभिनेता
५) अभिनेता असलेला अमिताभ बच्चन यांच्या मुलाचे नाव ७) संशय ८) एक म्हण-*** तो वजीर ९) एक म्हण-बळी तो कान ** १०) जरचा साथीदार १२) घोडेसवारी, फेरफटका १४) ख्रिश्चन बांधवाचा पवित्र धर्मग्रंथ १५) एखाद्या कामासाठी स्वत:जवळचे पैसे खर्च करणे-***मोड करणे १७) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक १८) उणीव, टंचाई १९) धान्याचा ढीग २१) स्पेशल, विशेष २३) उमर (मराठीत) २५) महिलांचा नाकात घालण्याचा एक दागिना २६) वतनाचा मालक २९) शेतातील कामाचा हंगाम ३०) खलनायक (इंग्रजीत) ३१) तक्रार, फिर्याद (हिंदीत) ३१) फर्निचरसाठी या झाडाचे लाकूड वापरतात
३३) चूक, चुकीचे (हिंदीत) ३४) ब्रेड (मराठीत)
३५) मान (हिंदीत) ३६) दुधावरील मलई ३७) आठवड्यातील एक दिवस-***वार, एक उपग्रह ३८) वाळूचे मैदान ३९) प्रॅक्टीस (मराठीत) ४०) कडूच्या विरूध्दार्थी शब्द ४१) माघारी देणे, माघारी करणे-*** देणे ४३) श्रवणेंद्रिय
४५) कालच्या अगोदरचा दिवस ४८) लिंबू पाण्याचे पेय
४९) भारताचे माजी कृषिमंत्री-*** पवार
५०) महिना

## सुडोकु - 15

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | | 2 | 7 | | 5 | 8 |
| 2 | | | 6 | 8 | | | 1 | |
| | 7 | | | | 5 | 4 | | 2 |
| | | 7 | | 3 | | | | 5 |
| | | 6 | | 9 | 8 | | | |
| 5 | | 3 | 7 | 6 | 4 | | | 9 |
| | 5 | | | | | 2 | 9 | |
| 7 | 6 | 2 | | | 9 | | 8 | |
| 8 | 1 | | | 5 | 6 | 7 | | |

# अकलूज येथील राजकीय कावळ्या कडून पदाचा दुष्प्रयोग?

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील राजकीय कावळ्याने स्वतःचे आयुष्य, आलिशान आणि सुख समृद्धीचे करण्यासाठी अध्यक्ष पदाचा, दुष्प्रयोग, करून पार्टीच्या विश्वासाला तडा लावल्यामुळे, अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे काम करणारे कार्यकर्ते, पक्षांतर करण्याच्या मार्गावर असल्याचे खात्रीशीर वृत्त सूत्रांकडून समजले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार सत्ताधारी पक्षाच्या शहर अध्यक्षाने जबाबदारीचे भान ठेवणे गरजेचे असते. अध्यक्ष पदाची जबाबदारी पार पाडत असताना, त्याने संघटन कौशल्य सिद्ध करणे आवश्यक असते. सामाजिक विधायक कार्याला चालना देणे महत्वाचे असते. आणि विशेष म्हणजे कार्यकर्त्यांची मते, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या पाहिजेत.कार्य आणि कर्तुत्वाचा प्रभाव पडला पाहिजे. संयम,नम्रता, समानता ठेवत कार्यकत्यांशी दीर्घकालीन नाते तयार झाले पाहिजे. वैचारिक बुद्धिमत्तेचा कस लागला पाहिजे, प्रभावी संवाद, उत्कृष्ट संभाषण, रोजच्या राजकीय घडामोडीचा अभ्यास करणे आवश्यक असते. असा अध्यक्ष मिळालेल्या पदाला न्याय देऊ शकतो, असे काही कार्यकर्त्यांनी मत व्यक्त केले.

तर काहीजण म्हणाले आमचा विद्यमान अध्यक्ष यांचा विसावा कथित मवाली आणि गुंड वृत्तीचे महाशय यांच्यात अधिक असतो. सुशिक्षित आणि संस्कारी कार्यकर्ते आमच्या अध्यक्षांना आवडत नाहीत. कथित मटक्यापासून गुटख्यापर्यंत आणि हिरव्या वनस्पती पासून ते भिशी व्याजबट्ट्यापर्यंत अशा विविध कारनाम्यात,त्यांनी नावलौकिक मिळवला आहे. आशा कारनाम्यानमुळे काही वर्षांपूर्वी अकलूजच्या खाकी साम्राज्याने, त्यांचा योग्य तो सत्कार करून,त्यांची जंगी मिरवणूक अकलूज परिसरात काढली असल्याचे काही कार्यकर्ते म्हणाले.

अकलूज मधील राजकीय कावळ्याने, पक्षाच्या मलिदावर डल्ला मारत आलिशान वैभव निर्माण केले.आलिशान बंगले, चार चाकी वाहने,वेगवेगळ्या ठिकाणी अमाप मालमत्ता, भिशी, मटका, गुटखा, मेंदू सुन्न करणारी हिरवी वनस्पती आणि महत्वाच व्याजबट्टा असे जर अध्यक्ष नेमले तर पक्षाला, पार्टीला बट्टा लागल्या शिवाय राहणार नाही अशी चर्चा जनतेत सुरू आहे.

# भोसले पिता-पुत्रांचा चपळगाव-बावकरवाडीत नागरी सत्कार

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त) :-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट यांच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच श्री गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त समाजहिताचे विविध उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने व यशस्वीपणे राबविल्याबद्दल चपळगाव व बावकरवाडी ग्रामस्थांच्या वतीने अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले या पिता-पुत्रांचा मानपत्र प्रदान करून नागरी सत्कार करण्यात आला. या सन्मान सोहळ्यास प्रशासक सरपंच वर्षा सिद्धाराम भंडारकवठे, सामाजिक कार्यकर्ते



सिद्धाराम भंडारकवठे, गणेश कोळी, ग्रामपंचायत अधिकारी विनोद डावरे, गावचे सुपुत्र सीए ओंकारेश्वर उटगे, ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर वाले, लिपिक उमेश सोनार, विजय कोरे, धर्मेंद्र दुलंगे, प्रकाश बुगडे, रतन कोरे, विष्णुवर्धन कांबळे, बसवराज हन्नुरे, रविकांत कोरे, पत्रकार शंभुलिंग अकतनाळ यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रशासक सरपंच वर्षा भंडारकवठे म्हणाल्या की, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या कायार्मुळे अक्कलकोटचे नाव जगभर पोहोचले आहे. मंडळामार्फत राबविण्यात येणारे प्रत्येक उपक्रम वर्तमान, भूत आणि भविष्य यांची सांगड घालणारे आहेत. गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रम आजच्या तरुण पिढीसाठी दिशादर्शक ठरत असून सामाजिक बांधिलकी जपत भोसले पिता-पुत्रांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून हा सन्मान करण्यात येत आहे. सत्काराला उत्तर देताना संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी चपळगाव-बावकरवाडी ग्रामस्थांचे आभार मानले. चपळगावकरांनी दिलेला हा सन्मान संपूर्ण अन्नछत्र मंडळ परिवारासाठी प्रेरणादायी असून भविष्यातही सेवा, संस्कार आणि समाजहिताचे उपक्रम अधिक जोमाने राबविण्याचा संकल्प यानिमित्ताने अधिक दृढ झाल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमामुळे ग्रामस्थांनी सामाजिक कार्याची दखल घेत भोसले पिता-पुत्रांच्या कार्याचा गौरव केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कारगिलच्या वीरांना बार्शीत अभिवादन; शहीद स्मारकावर विजय दिवस उत्साहात

**बार्शी (कटूसत्य वृत्त) :-** कारगिल विजय दिनानिमित्त बार्शी शहरातील शहीद स्मारक येथे कारगिल विजय दिवस अत्यंत देशभक्तीपूर्ण, भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी कारगिल युद्धातील शूरवीर जवानांना पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाला आमदार राजेंद्र राऊत, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, जिजाऊ गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन विजय गरड, माजी सैनिक परिषदेचे अध्यक्ष मेजर सुरवसे तसेच बार्शी पोलीस स्टेशनचे गणेश कुंभार यांच्यासह



विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी कारगिल युद्धातील भारतीय सैनिकांच्या अद्वितीय शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेचा गौरव केला. देशाच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर जवानांच्या बलिदानाचे स्मरण करत त्यांना कृतज्ञ अभिवादन करण्यात आले. यावेळी युवकांनी कारगिलच्या वीर सैनिकांकडून प्रेरणा घेऊन राष्ट्रसेवेसाठी सदैव तत्पर राहावे, असे आवाहनही मान्यवरांनी केले. कार्यक्रमात जिजाऊ गुरुकुल, खांडवी येथील शिक्षक, विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत शहीद जवानांना विनम्र अभिवादन केले. देशभक्ती, राष्ट्रप्रेम आणि शौर्याची प्रेरणा देणारा हा कार्यक्रम बार्शीकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

# वारकरीकेंद्रित नियोजनामुळे आषाढी वारी यशस्वी मुख्यमंत्री फडणवीसांच्या मार्गदर्शनाची गोरे यांची स्तुती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** यंदाची आषाढी वारी वारकरीकेंद्रित नियोजन, प्रभावी सुविधा आणि प्रशासनाच्या उत्कृष्ट समन्वयामुळे अत्यंत यशस्वी ठरली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे व तातडीने उपलब्ध करून दिलेल्या निधीमुळे वारकऱ्यांना दर्जेदार सुविधा देता आल्या, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

धाराशिव येथील कार्यक्रम आटोपून मुंबईकडे रवाना होताना सोलापुरात पत्रकारांशी संवाद साधताना गोरे बोलत होते. यावेळी त्यांनी यंदाच्या वारीतील नियोजनाचा आढावा घेत प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले.

गोरे म्हणाले की, यंदाच्या वारीत वारकऱ्यांच्या सोयीसुविधांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले.

**फडणवीस महाराष्ट्रातच राहतील;**
**गोगावले यांच्या वक्तव्यावर गोरे यांचा पलटवार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र विकासाच्या दिशेने वाटचाल करत असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील भाजपच्या यशातून जनतेने त्यांच्या कामावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे ते मुख्यमंत्री म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करतील, असा विश्वास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला. देवेंद्र फडणवीस केंद्रात गेल्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होतील, या मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या वक्तव्याबाबत विचारले असता, 'कोण कुठे जाणार हे ठरवण्याचा अधिकार तुम्हाला कुणी दिला?' असा सवाल करत गोरे यांनी गोगावले यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला.

मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्र, जर्मन हँगर, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य सेवा, चरणसेवा, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे लाखो वारकऱ्यांना कोणत्याही अडचणीशिवाय वारीचा आनंद घेता आला.

यंदा व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे सामान्य वारकऱ्यांना कमी वेळेत आणि सुलभ पद्धतीने श्री विठ्ठलाचे दर्शन घेता आले. दर्शन व्यवस्थेतील पारदर्शकता आणि शिस्तीमुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.

वारीदरम्यान वारकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर चरणसेवा आणि आरोग्य तपासणी उपक्रम राबविण्यात आले. आरोग्य विभाग, स्वयंसेवी संस्था आणि विविध यंत्रणांच्या समन्वयातून ही सेवा प्रभावीपणे देण्यात आल्याने पायी चालत आलेल्या वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

पंढरपूरमध्ये वारीपूर्वी आणि वारीनंतर साथीच्या रोगांचा धोका लक्षात घेऊन विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यापूर्वी वारीनंतर साथीच्या आजारांच्या भीतीमुळे अनेक नागरिक शहराबाहेर जात असत. मात्र यंदा प्रशासनाने व्यापक स्वच्छता मोहीम राबवून शहर स्वच्छ ठेवण्यात यश मिळविले. त्यामुळे साथीच्या रोगांचा धोका कमी झाला असून नागरिकांमध्येही दिलासादायक वातावरण असल्याचे गोरे यांनी स्पष्ट केले. वारीच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस प्रशासन तसेच विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावल्याचे सांगत पालकमंत्र्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण आषाढी वारीवर सातत्याने लक्ष ठेवून प्रशासनाने मागणी केलेला निधी व आवश्यक सुविधा तातडीने मंजूर केल्या. शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून यंदाची आषाढी वारी राज्यासाठी आदर्श ठरल्याचा विश्वास पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.

# किडनी विकाराने झुंजणाऱ्या चिमुकल्या समर्थला आ.खरेंचा मदतीचा हात

**मोहोळ (कटूसत्य वृत्त) :-** मोहोळ तालुक्यातील नजीकपिंपरी येथील चिमुकल्या समर्थ अमोल सुरवसे याच्या उपचारासाठी आमदार राजू खरे यांनी पुढाकार घेत स्वखर्चातून २५ हजारांची आर्थिक मदत केली. दोन्ही किडन्या निकामी झाल्याने समर्थवर नियमित डायलिसिस सुरू असून, त्याच्या उपचारासाठी ही मदत देण्यात आली.

समर्थचे वडील अमोल बालाजी सुरवसे हे रोजंदारीवर काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मुलाच्या गंभीर आजारामुळे उपचाराचा वाढता खर्च पेलणे कुटुंबासाठी अत्यंत कठीण झाले आहे. ही बाब लक्षात येताच आमदार राजू खरे यांनी या कुटुंबाची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली



आणि उपचारासाठी तातडीने २५ हजारांची आर्थिक मदत सुपूर्द केली.

यावेळी आमदार खरे म्हणाले, "लोकप्रतिनिधी म्हणून विकासकामे करणे हे माझे कर्तव्य आहेच; मात्र एखाद्या गरजू कुटुंबाच्या दुःखात सहभागी होऊन त्यांना आधार देणे हीदेखील माझी सामाजिक जबाबदारी आहे. माझ्याकडून झालेली ही छोटीशी मदत समर्थच्या उपचारासाठी उपयोगी पडेल, अशी अपेक्षा आहे."

तसेच, समर्थ लवकरात लवकर पूर्णपणे बरा व्हावा आणि त्याला निरोगी व आनंदी आयुष्य लाभावे, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली. "जनतेचा विश्वास हेच माझे बळ असून जनसेवाच माझे ध्येय आहे," असेही त्यांनी नमूद केले.

आमदार राजू खरे यांच्या या मदतीमुळे सुरवसे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

दरम्यान, समर्थच्या पुढील उपचारांसाठी समाजातील दानशूर व्यक्ती आणि विविध सामाजिक संस्थांनीही मदतीचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अकलूजमध्ये महिलांसाठी ८ ऑगस्ट रोजी मोफत कर्करोग तपासणी शिबिर



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल (शंकरनगर), सयाजीराजे मित्र मंडळ आणि नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल (बार्शी) यांच्या संयुक्त विद्यमाने कै. राजमाता रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त महिलांसाठी मोफत कर्करोग (कॅन्सर) निदान व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी डॉ. अभिजितराजे भोसले, डॉ. अरुंधती खराडे-पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे कार्यकारी संचालक सुहास पवार आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिराची माहिती व ठळक वैशिष्ट्येः दिनांकः शनिवार, ८ ऑगस्ट २०२६

वेळः सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत

ठिकाणः जिजामाता कन्या प्रशाला, अकलूज उपलब्ध तपासण्या व सुविधाः

या शिबिरामध्ये बार्शी येथील नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल चे तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहून महिलांची मोफत तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत. हेमोग्लोबीन तपासणी गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोग निदानासाठीः 'पॅप टेस्ट', 'स्मिअर टेस्ट' आणि 'एचपीव्ही टेस्ट'.

स्तनाच्या कर्करोग निदानासाठीः तज्ज्ञ डॉक्टरांच्या तपासणीनंतर गरज भासल्यास मॅमोग्राफी (स्तनाची सोनोग्राफी) ही मोफत बार्शी कॅन्सर हॉस्पिटल येथे करून दिली जाईल.

सध्या महिलांमध्ये ब्रेस्ट (स्तनाचा) कॅन्सर आणि गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. बऱ्याचदा माहितीचा अभाव आणि उपचाराचा खर्च किंवा भीती पोटी महिला आजाराकडे दुर्लक्ष करतात.

आजाराचे वेळीच निदान झाल्यास त्यावर यशस्वी उपचार शक्य असतात. 'प्रतिबंध हा उपचारापेक्षा श्रेष्ठ' हा संदेश देत तालुक्यातील अधिकाधिक महिलांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सयाजीराजे मोहिते-पाटील यांनी केले आहे.

# महापालिकेच्या वतीने पालकमंत्री गोरे यांचा सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या आषाढी वारीचे नियोजन, समन्वय आणि विविध शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या प्रभावी व्यवस्थापनामुळे वारी यशस्वीरीत्या पार पडली. आषाढी वारीच्या यशस्वी नियोजन व व्यवस्थापनाबद्दल" सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांची सुंदर मूर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, महापालिका तसेच इतर सर्व शासकीय यंत्रणांनी उत्कृष्ट समन्वय साधून वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुकर सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. लाखो भाविकांच्या सेवेसाठी प्रशासनाने केलेल्या नियोजनामुळे यंदाची आषाढी वारी अत्यंत सुरळीत व यशस्वी झाली या प्रसंगी स्थायी समिती सभापती सौ. रंजीताताई चाकोते, सभागृह नेते नरेंद्र काळे, शहराध्यक्ष तथा नगरसेविका सौ. रोहिणी ताई तडवळकर, जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहाजी पवार, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार नगरसेवक अक्षय आजीखाने, बिज्जू अण्णा प्रधाने तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

# उजनी धरणातून विसर्गात मोठी वाढ; भीमा नदीत ६१,६०० क्युसेक्स पाणी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** भीमा खोऱ्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उजनी धरणातील पाण्याची आवक वेगाने वाढत असल्याने पूर नियंत्रणासाठी उजनी धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात मंगळवारी मोठी वाढ करण्यात आली आहे. सध्या धरणाच्या सांडव्यावरून ६०,००० क्युसेक्स तर वीजगृहातून १,६०० क्युसेक्स असा एकूण ६१,६०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग भीमा नदीपात्रात सुरू आहे. त्यामुळे भीमा नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होण्याची शक्यता असून नदीकाठच्या गावांना प्रशासनाने हाय अलर्ट जारी केला आहे. उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरू आहे. दौंड नदी मापन केंद्रावरून धरणात ५५,५८७ क्युसेक्स पाणी येत असून नदीची पाणीपातळी ५०१.११० मीटर इतकी नोंदविण्यात आली आहे. धरणाची सुरक्षितता आणि पूर नियंत्रण लक्षात घेऊन धरण व्यवस्थापन विभागाने विसर्गात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या नोंदीनुसार उजनी धरणाची पाणीपातळी (RWL) ४९६.८२० मीटर इतकी झाली असून धरणातील उपयुक्त पाणीसाठा १,५१३.८५ दशलक्ष घनमीटर (५३.४६ टीएमसी) आहे. धरणाची उपयुक्त साठा क्षमता ९९.७८ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. धरणातील एकूण पाणीसाठा ३,३१६.६६ दशलक्ष घनमीटर (११७.११ टीएमसी) असून जलसाठा क्षेत्र ३३६.०७ चौ.कि.मी. इतके झाले आहे.

धरणातून सध्या भीमा नदीपात्रात ६१,६०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू असतानाच मुख्य कालव्यातून २,५०० क्युसेक्स, टनेलमधून ९०० क्युसेक्स, सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून २८० क्युसेक्स आणि दहीगाव उपसा सिंचन योजनेतून ९० क्युसेक्स पाणी सोडण्यात येत आहे. परिस्थितीचा सातत्याने आढावा घेतला जात असून पाण्याची आवक कायम राहिल्यास विसर्गात आणखी वाढ केली जाऊ शकते, असा इशाराही धरण प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे भीमा नदीकाठच्या सर्व नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**नदीकाठच्या गावांना हाय अलर्ट**



**प्रशासनाचे नागरिकांना आवाहन**

उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत असल्याने आलेगाव, रुई, टाकळी, आलेगाव बु., रांजणी, गारअकोले, शेवरे, बेंबळे, मिटकलवाडी तसेच भीमा नदीकाठच्या इतर गावांतील नागरिकांनी विशेष सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नदीपात्रात किंवा नदीकाठावर जाणे टाळावे. मासेमारी, पोहणे अथवा इतर कारणांसाठी नदीत उतरू नये. नदीपात्रातील जनावरे, शेती साहित्य, मोटारी, पंप व इतर वस्तू तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवाव्यात. सखल भागातील नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

धरण व्यवस्थापन विभाग परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असून आवश्यकतेनुसार विसर्गात बदल करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**– सु. उ. डुंबरे,** कार्यकारी अभियंता
उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भीमानगर

# सुसंस्कृत पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांची - गायकवाड कै. सदाशिवराव मोरे आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणे एवढेच शिक्षकांचे कर्तव्य नसून, समाजाला दिशा देणारी सुसंस्कृत, चारित्र्यसंपन्न आणि जबाबदार पिढी घडविण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांवर आहे. बदलत्या काळात शिक्षणासोबत संस्कारांचे महत्त्व अधिक वाढले असून, मूल्याधिष्ठित शिक्षणातूनच सक्षम समाजाची निर्मिती होऊ शकते, असे प्रतिपादन पुणे पीपल्स मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष श्रीधर गायकवाड यांनी केले.

रविवारी, हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित केलेल्या कै. सदाशिवराव मोरे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी परिवाराचे प्रमुख




श्रीकांत मोरे हे होते

यावेळी कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष संजीव खडके, जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार, उपनिबंधक उमेश पवार, जिल्हा विशेष लेखापरीक्षक (वर्ग-१) व्ही. व्ही. डोके यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित

यावेळी आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते विविध जिल्हा परिषद शाळांमधील गुणवंत शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

यावर्षीचा कै. सदाशिवराव मोरे आदर्श शिक्षक पुरस्कार वैशाली कार्वेकर (जि.प. शाळा, शेटे वस्ती, सोलापूर), निर्मला केदार-लिंगे (जि.प. शाळा, जगताप वस्ती, सोलापूर), राहुल राठोड (जि.प. शाळा, बेलाटी, ता. उत्तर सोलापूर), चंद्रकांत पुंडलिक नवले (जि.प. शाळा, वाघोली, ता. मोहोळ) तसेच रमेश गोविंद जाधव (जि.प. शाळा, इंदिरानगर, कासेगाव, ता. दक्षिण सोलापूर) आणि विजय अच्युत गुंड (जि.प. शाळा, गावडे वस्ती, ता. मोहोळ) यांना प्रदान करण्यात आला.

आपल्या भाषणात श्रीधर गायकवाड म्हणाले की, शिक्षक हा समाज परिवर्तनाचा सर्वात प्रभावी घटक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्यांच्यामध्ये प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम आणि नैतिक मूल्ये रुजविण्याचे कार्य शिक्षकांनी सातत्याने केले पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक युगात गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच संस्कारक्षम शिक्षण देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात पुरस्कार निवड समितीचे प्रमुख राहुल सुरवसे आणि प्रिया सुरवसे यांनी पुरस्कारांची घोषणा करून कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करून त्यांच्या कायार्तून इतर शिक्षकांना प्रेरणा मिळावी, हा या पुरस्कारामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा शाल, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.